महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे ४११००१
Web : www.dhepune.gov E-mail : budget.dhepune@nic.in.
फोन नं. ०२०/२६१२२१११, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११५३

क्र अर्थस-२०१७(०१०३/१७) लेखा -२ / 1280 दि. २४ जुलै २०१७

27 JUL 2017

प्रति,

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण ) यांच्या अधिनस्त् असलेली
शासकीय महाविद्यालये / संस्था / वसतिगृहे / कार्यालये

**विषय - स्वेच्छा अनुदानातून वित्त् व्यवस्था केलेली लहान बांधकामाचे प्रस्ताव सादर करणेबाबत**

सदंर्भ - १.सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.अनिवि २०१७/ प्र. क्र. ६५/ अर्थ -२ दि. २१/४/२०१७

संचालनालयाच्या अधिनस्त् शासकीय महाविद्यालये/ संस्था / वसतिगृहे / कार्यालये यामधील गौणबांधकामाना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी तरतुद अर्थसकंल्पित करण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने संचालनालयाच्या अधिनस्त् असलेली शासकीय महाविद्यालये/ संस्था / वसतिगृहे/ कार्यालये यामधील किरकोळ बांधकामे/नुतनीकरणाची कामे/विद्युतीकरणाची कामे/ इमारत डागडुजीची कामे करण्यासंदर्भात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. खालील मुद्दे विचारात घेवून प्रस्तावित कामाचे प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

१. प्रस्तावित गौणबांधकामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागकडील खर्चाचे अंदाजपत्रक प्रस्तावासोबत असावे.

२. किरकोळ दुरुस्ती ,नुतनीकरणाची कामे / इमारत डागडुजी या साठी एक प्रस्ताव तसेच विद्युतीकरणाचे नुतनीकरण, दुरुस्ती यासाठी एक प्रस्ताव असे दोन प्रस्ताव एका संस्थेस सादर करता येतील. यापैकी कोणता प्रस्तावातील कामे प्राधान्यक्रमाने करावयाची आहेत याचा तपशील देण्यात यावा.

३. प्रत्येक प्रस्ताव हा जास्तीत जास्त् रु.१.०० लक्ष पेक्षा अधिक रकमेचा असू नये.

४. प्रस्तावित करण्यात आलेली गौणबांधकामे ही विद्यार्थीना अभ्यासक्रमास पुरक तसेच शैक्षणिक उपक्रमाशी संबधित असावीत. (वर्गखोल्या, क्रिडांगण, प्रयोगशाळा, प्रसाधनगृहे, पाणी पुरवठा व्यवस्था, ग्रंथालय, याची दुरुस्ती /नुतनीकरण / विद्युतीकरण )

५.उपकरणे ,फर्निचर खरेदी / शिक्षक - शिक्षकेतर यांच्यासाठी कक्ष /दालने तयार करणे इ.चे प्रस्ताव सादर करण्यात येवू नयेत.

६. ज्या इमारती मध्ये नुतनीकरणाची कामे करावयाची आहेत ती इमारत संस्थेच्या मालकीची असणे आवश्यक आहे. भाडे तत्वावर घेतलेल्या इमातीमध्ये सदरची कामे करण्यात येवू नयेत.

७. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रसाधनगृहाची सुविधा असणे आवश्यक आहे. तरी प्रस्ताव सादर करताना प्रसाधनगृहाचे बांधकाम /नुतनीकरण या कामास प्राधान्य देण्यात यावे.

८. प्रस्तावित कामास मान्यता मिळाल्यानंतरच सदरची कामे सुरु करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात यावे.

९. प्रस्तावित कामे पुर्ण झाल्यानंतर पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेवून संचालनालयास सादर करण्यात यावे.

१०. प्रस्तावित कामाच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तरतुद हस्तांतरीत केल्यानंतर प्रस्तावित कामे पुर्ण करण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा. सदरचे काम दि.३१/३/२०१८ पर्यत पुणे करणे अपेक्षित आहे.याबाबत झालेल्या खर्चाचा तपशील संचालनालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

११. एकापेक्षा जास्त प्रस्ताव सादर करताना कामाचा प्राधान्यक्रम प्रस्तावामध्ये नमुद करण्यात यावा.

१२. सदरचे प्रस्ताव चारमाही अंदाजपत्रक सन २०१७-१८ सोबत सादर करण्यात यावेत.

(डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे